## प्रकरण दुसरे

# ‘जिणं आमुचं’ व ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनांतील सामाजिकता

# प्रकरण दुसरे

# 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्मांची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सामाजिकता

२.१ प्रास्ताविक

२.२ 'जिणं आमुचं' या आत्मकथनाचा आशय

२.३ 'माझ्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनाचा आशय

२.४ साहित्यातील सामाजिकता

२.५ दलित आत्मकथनांतील सामाजिकता

२.६ 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' आत्मकथनांतील सामाजिकता

२.७ दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतील सामाजिकतेचे विशेष

२.८ सारांश

-----

# प्रकरण दुसरे

# 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सामाजिकता

## २.१ प्रास्ताविक :

या अगोदरच्या प्रकरणात आपण दलित शब्दाची संकल्पना, दलित जाणीवेचे स्वरूप, दलित साहित्य प्रेरणा स्वरूप, दलित आत्मकथनांची स्वरूप विशेष, वाटचाल आणि स्त्रियांची आत्मकथने याविषयी माहिती घेतली.

आता या प्रकरणात बेबी कांबळे यांची 'जिणं आमुचं' व शांताबाई कांबळे यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सामाजिकतेचा विचार करावयाचा आहे. तत्पूर्वी या दोन्ही आत्मकथनांचा आशय थोडक्यात लक्षात घेऊ.

## २.२ 'जिणं आमुचं' मधील आशय :

'जिणं आमुचं' हे सौ. बेबी कांबळे यांचे पुस्तक म्हणजे एका दलित स्त्रीच्या दु:खाची कहाणी आहे. एक आत्मचरित्र म्हणूनच या लेखनाचा परामर्श अनेक वृत्तपत्रातील पुस्तक परिचय या सदरातून करून देण्यात आला आहे. परंतु या पुस्तकात लेखिकेचा चरित्रात्मक भाग फारच कमी आलेला आहे. लेखिकेने यातून स्वत:च्या आयुष्याचा वेध घेण्याचे पूर्णत: टाळले आहे आणि प्रस्तावनेत मॉन्सिस बर्कसन यांनी लिहिल्याप्रमाणे – ''पन्नास वर्षापूर्वीच्या पश्चिम महाराष्ट्रातील महार समाजाचे व प्रामुख्याने स्त्रीजीवनाचे चित्रण हा या पुस्तकाचा खरा गाभा आहे.''[१] डॉ. आंबेडकर यांनी समाजाचे केलेले आमूलाग्र परिवर्तन आणि आजच्या महार

समाजाला बाबासाहेबांच्या ऋणाचे झालेले विस्मरण यांची खंत लेखिकेने व्यक्त केली आहे. म्हणून या लेखनात आत्मचरित्राचा भाग नाममात्रच असून महार समाजातील स्त्रीचे आणि एकंदर समाज चालिरीतींचे चित्रण जास्त असा प्रकार झाला आहे. म्हणून आत्मचरित्र म्हणून गौरविलेल्या या लेखनाचे स्वरूप आत्मचरित्राचे नसून स्वकथनाचे आहे.

सौ. बेबी कांबळे यांनी स्वत:पेक्षा आपल्या समाजाच्या पूर्वायुष्याचे चित्रण 'जिणं आमुचं'मध्ये केला आहे. हे 'जिणं' केवळ लेखिकेचे नसून लेखिकेसारख्या अनेक स्त्रियांचे आहे. १९४० वर्षापूर्वी दलित स्त्रीचे जीवन एकमेकींपासून पूर्णपणे वेगळे नव्हते. महार समाजातील स्त्री, तिचा अल्पवयातील विवाह, तिच्यावर वरचष्मा ठेवण्यासाठी सतत प्रयत्नरत असणारी सासू, तिने पळून जाऊ नये म्हणून तिच्या पायात खोडा टाकणारे व प्रसंगी तिचे नाक कापायला सिद्ध असणारे सासू-सासरे, दीर, नवरा या सर्वांचे चित्रण केलेले आहे. हालअपेष्टाग्रस्त व रूढीग्रस्त समाजाला देव-देवर्षी, अंगारे-धुपारे यांचेच महत्त्व कसे वाटत होते. याशिवाय अंगात येणे, पोतराज सोडणे,देवदेवतांना तुष्टविणे यात हा समाज आपली सर्व दु:खे कशी विसरत होता याचेही चित्रण त्यांनी केलेले आहे. त्याचबरोबर या स्थितीतून वर येण्यास आंबेडकरांचे कार्य कसे उपकारक ठरले याची नोंद घेऊन लेखिकेने कृतज्ञता व्यक्त केली आहे. प्रस्तुत ..........स्वपनाला समाजशास्त्रीय निबंधाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

'जिणं आमुच' म्हणे ''दलित स्त्रीजीवनाचा मार्मिक आत्मशोध'' असल्याचा निष्कर्ष भारती निगुडकर [२] यांनी 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये प्रस्तुत पुस्तक परीक्षणाच्या निमित्ताने काढलेला आहे. 'स्त्रीत्व' आणि 'दलिततत्व' या दोहोंच्या

पेचात दलित स्त्री अत्यंत केविलवाणे आयुष्य जगत होती. या संदर्भात विलास जाधव लिहितात, ''प्रस्तुत चरित्र केवळ व्यक्तिगत सुखदु:खाचे चविष्ठ वर्णन करणोर नाही.'' 'आमच्या' अशा सामाजिक जाणीवेचा सूर त्याला आहे. आपल्या सभोवती असणाऱ्या आयाबायांच्या जीवन विश्वाचा वेध घेत त्यांच्या दु:ख दारिद्रयाचा एक एक पदर लेखिकेने उलगडून दाखवला आहेत.[३] महार समाजातील सासुरवाशीण मोठी केविलवाणी आहे. त्यावेळचा मोठेपणा म्हणजे स्त्रियांना उंबऱ्याबाहेर जाऊ द्यायचे नाही व ज्या स्त्रिया कामाला लाकडं गोळा करायला बाहेर पडतील त्यांनी सवर्णाचा मान राखायचा. नाही राखला तर त्यांच्या माहेरच्या सात पिढ्यांचा उद्धार व्हायचा. विवाहाचे विधी कौतुकाने साग्रसंगीत साजरे करायचे. नांदायला मुलगी आली की मग मात्र तिचा सासुरवास करायचा. लेखिका म्हणते, ''ही लहानपणाची सक्तमजूरी परवडली पण वयात आल म्हंजे सुळावर चढल्यासारखे सुनेला पहिला पदर आला की सासूबाईची उलघाल व्हायची आणि त्या घरात सासूबाई सारखी बसून राहायची. सासूने डोळ्यात तेल घालून दोघांची राखण करायची. मुलाची अन् सुनेची नजरभेटच होऊ द्यायची नाही. रात्री ती दोघं एकत्र येतील म्हणून सासुबाईन रात्रभर जागरण करावं कारण बाईच्या नादान मुलगा बिघडेल. आईबापाना विसरेल. बायको डोक्यावर घेईल. या प्रकारामुळे मुलाच्या मनात बायकोबद्दल वितुष्ट निर्माण करावे, सून पाण्याला गेली की, भाकरीच्या पिठात बांगडीच्या काचा मिसळून सून आपल्या मुलाचा घात करायला निघाल्याचे सिद्ध करावे. दुसऱ्या बाजूला आपल्या मुलाचे कान भरावे आणि सून बाहेरख्याली असल्याचे त्याला सांगावे. त्यामुळे कंटाळून तिने माहेरी जावे तर तिथूनही तिची हकालपट्टी व्हावी मग तिने पाहून जाऊ नये म्हणून पाच किलो वजनाचा लाकडाचा

खोडा त्या मुलीच्या पायात अडकवला जायचा. शिवाय मारहाण, छळ सुरूच असायचा. एवढ्यावर न थांबता तिच्या चारित्र्याचा संशय घेऊन तिच्या नाकाचा शेंडाही तोडायची सूचना केली जायची. अशा नाक तोडलेल्या मुलीला 'मुडी' म्हटले जायचे. मग या रूढीला कुणाचाच आधार नसायचा. अशा या निष्पाप मुलीचे बलिदान १९४० पर्यंत सुरू होते.''

एकंदरीत 'जिणं आमुचं' मध्ये बेबी कांबळे यांची आपल्या समाजातील जीवनाचा विशेषत: स्त्री जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करत असताना अनेक ठिकाणी महारांच्या जगण्यातील कारूण्याला किंचित विनोदाची झालर लावलेली आहे. उदा. आषाढातील आंघोळीचा थाट किंवा अनंत ठिगळै जोडून केलेले मराकसा धुण्याचा प्रसंग या गोष्टींची साक्ष देतात. मेलेल्या गुराचे मांस, गावातून मागून आणलेल्या तिखट शिळ्या अन्नाचे कालवण, किंवा घरातील दारिद्र्याचे चित्रण हे सारे शहारे आणणारे आहे. या सर्व विवेचनात कुठेही विद्रोहाचा सूर नाही किंवा आक्रस्ताळेपणाही नाही हे विशेष. बाबासाहेबांसंबंधी लिहिताना मात्र अनेकदा त्यांच्या भाषेची सहजता कमी होऊन प्रबोधनाचा सूर त्याला प्राप्त होताना दिसतो. मात्र काही ठिकाणी लेखिकेची प्रगल्भदृष्टी सुटलेली दिसते. या लेखनात आलेल्या विविध व्यक्ती लेखिकेचे आजोबा, आईवडील यांचे चित्रण, नेटकेपणाने आलेले आहे. याशिवाय समाजातील विविध रूढी, परंपरा, लग्नसोहळा, जत्रा हे प्रसंग हुबेहूब आलेले आहेत.मात्र यात लेखिकेच्या व्यक्तिगत अनुभवांना मर्यादित स्थान लाभल्यामुळे 'स्व' पेक्षा 'स्वेतरां'चे जीवनच त्यात अधिक्याने आलेले आहे. यातून वाङ्मयीन मूल्यापेक्षा सामाजिक मूल्यांना प्राधान्य लाभले आहे.

चावडीवरील वादविवादातून हळूहळू समाज बदलू लागला. बाबासाहेबांच्या चळवळीच्या चर्चा चावडीवर होत असत. त्यातून दलितात परिवर्तन होऊ लागले. पण सुधारलेल्या समाजाला बाबासाहेबांच्या संघर्षाची, तत्वविचारांची किंमत न वाटता, विस्मरण झाले आहे. याची खंतही त्या व्यक्त करतात. एकाचवेळी सवर्ण व स्वसमाज यांना 'फटकारण्याची' त्यांची वृत्ती ही इतर दलित आत्मकथनांपेक्षा वेगळी ठरली. खऱ्या अर्थाने सामाजिकता व सांस्कृतिकता या दृष्टीने हे आत्मकथन महत्त्वाचे आहे.

## २.३ 'माज्या जल्माची चित्तरकथा' आशय :

सौ. शांताबाई कांबळे यांचे आत्मचरित्र मूळात 'पूर्वा' या मासिकातून १९८२-१९८३ मध्ये क्रमशः प्रसिद्ध झाले व या दृष्टीने पहिले दलित स्त्रीचे समग्र आत्मचरित्र लिहिण्याचा मान शांताबाईनाच मिळाला. प्रकाशकाचे मनोगत आहे.[४] हे आत्मचरित्र आयुष्यात प्रथमच स्त्री शिक्षणाची संधी मिळालेल्या दलित स्त्रीच्या संघर्षमय जीवनाची कहाणी आहे. स्त्री-मुक्ती लढ्यातील एक महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे आत्मचरित्र होय. प्रस्तुत आत्मचरित्रात लेखिकेने आपल्याला शाळेत टाकल्यापासून ते १९८१ साली शिक्षणाधिकारी म्हणून निवृत्ती होईपर्यंतच्या सतत विकसित होत जाणाऱ्या जीवनाचा आलेख चित्रित केलेला आहे. बाबासाहेब आंबेडकर यांची तत्त्वे व शिकवणूक अंगी बाणावून त्यावर हुकूम आपल्या जीवनप्रवासाची वाटचाल करणीर ही लेखिका आहे. एकप्रकारे या प्रेरणेमुळे लेखिकेच्या मनाचे व नंतर व्यक्तिमत्त्वाचे दलितत्व कसे गळून पडले त्याचा हा इतिहास आहे. व्हर्न्याकुलर फायनल उत्तीर्ण होणे, शिक्षकाचा पेशा पत्करणे, ट्रेनींग पूर्ण केल्यावर मुख्याध्यापिका आणि स्वत:ची कर्तबगारी दाखवून उत्स्फूर्त गौरव

समारंभानंतर सेवानिवृत्त होणे असे समृद्ध जीवन शांताबाईंच्या वाट्याला आले. त्यांनी केवळ स्वत:चे जीवन घडविले असे नाही तर आपल्या मुलांनाही त्यांनी हा शैक्षणिक वारसा दिला. मराठीचे प्राध्यापक व कवी अरूण कांबळे, काव्यक्षेत्रातील दुसरा मुलगा चंद्रकांत कांबळे, धामी मुलगी, प्रा. मंगला यांना हा शैक्षणिक वारसा लाभला आहे. मनाची सुसंस्कृतता व तेजस्वी वृत्ती यामुळे सासर माहेर सांभाळून आणि अडचणीवर मात करत लेखिकेने हे यश गाठले. म्हणूनच त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी दु:ख कष्टांची रडगाणी गायली नाहीत. दु:खांना कुरवाळले नाही, दलित स्त्री व गरीब म्हणून कोठेही सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला नाही. म्हणूनच स.शि. भावे यांनी या आत्मचरित्राचे परिक्षण करताना ''सौ. शांताबाई कांबळे यांचे आत्मचरित्र मराठी सामाजिकता आणि मराठी साहित्य यांच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाची घटना होय.''[५] असे म्हणून या लेखनाला 'अभिजात आत्मकथा' म्हणून संबोधले आहे. यातून लेखिकेचा सलग जीवनप्रवास व वार्धिष्णू व्यक्तिविकास वाचकांच्या डोळ्यासमोर उभा राहतो. केवळ दलित म्हणून नव्हे तर ज्या काळात एकूणच स्त्रिया फारशा शिकत नव्हत्या व त्यातही दलित स्त्रियांना शिक्षण मिळणेही कठिण गोष्ट होती अशा काळात शांताबाईनी जो शैक्षणिक प्रवास प्रारंभ केला व त्या ज्या इस्पित स्थळी जाऊन पोहचल्या त्याचे कौतुक वाटते. प्रवाही निवेदनामुळे आत्मचरित्र वाङ्मयात प्रस्तुत लेखनाचे महत्त्वपूर्ण स्थान राहील यात शंका नाही.

## २.४ साहित्यातील सामाजिकता :

साहित्य आणि समाज यांचा संबंध जवळचा आहे. समाजातील प्रत्येक घटनेचा, स्थित्यंतराचा, प्रतिबिंबात्मक प्रभाव साहित्यावर पडतो. म्हणून साहित्य हे

'जागृत मनाचा आत्मप्रत्ययपूर्ण हुंकार' म्हणून ओळखले जाते. समाजजीवन आणि वाङ्मय यांचा दृढ संबंध आहे. म्हणून वाङ्मय हे समाज परिस्थितीचे अपत्य आहे असे तेन म्हणतो. 'साहित्य म्हणजे भाषेच्या माध्यमाने केलेली फलनिर्मिती, साहित्यिक म्हणजे कलानिर्मितीची क्षमता असलेली व्यक्ती आणि समाज म्हणजे पारंपरिक व नव्याने निर्माण होणाऱ्या हितसंबंधाच्या संदर्भात एकत्र आलेला व एकत्र रहाणारा मानवसमूह. साहित्याची निर्मिती होते तेव्हा ती आपल्याबरोबर समाजातील विचारांनाही नते त्या - त्या समाजातील विचारांवर त्याचा काही ना काही प्रमाणात ठसा उमटलेला आपल्याला दिसतो. म्हणूनच कधी कधी समाजातील रूढ विचारांमध्ये बदल घडवून आणण्याची आकांक्षाही कलाकृती पाहते. साहित्यातील सामाजिकता यादृष्टीने विचार करता मानवी जीवनाचे दर्शन घडविणे हेच साहित्याचे अंतिम ध्येय असते.'

साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे व समाजनिर्मित भाषा हे त्याचे माध्यम आहे. त्यामुळे सहित्यातून निर्माण होणारे बहुसंख्य प्रश्न अंतिमत: सामाजिक प्रश्नच असतात. साहित्यनिर्मिती ही ज्या व्यक्तिमनातून होते त्या व्यक्तिमनाचे स्वरूप तसे समाजनिर्मितच असते. म्हणजे व्यक्तीची व्यक्ती म्हणून होणारी जी घडण असते त्यात सभोवतालचे संस्कार मोठ्या प्रमाणात असतात. तेव्हा अनुभवाचा स्वीकार व संगतीपूर्वक अविष्कार करणारे मनच जर समाजाची निर्मिती असेल तर त्या मनाच्या साहित्यरूपी निर्मितीत ती संस्कारीत झालेली 'सामाजिकता' दिसून येते. ज्या ज्या वेळी व्यक्तिमनात व पर्यायाने समूहमनात निरनिराळ्या पातळीवर आंदोलने झाली आहेत. त्या-त्या वेळी त्याचे प्रगटीकरण

साहित्याद्वारे झालेले दिसून येते. म्हणूनच साहित्यातील अनेक भाविनक अविष्करणाचे मूळ समाजातील व्यक्तिमनाशी निगडीत आहे.

म्हणूनच मॅथ्यू आर्नोल्ड या समीक्षकानेही साहित्याला 'जीवनभाष्य' असे म्हटले आहे. साहित्यातील सामाजिकतेचे स्वरूप पाहिल्यावर दलित आत्मकथनांमधील सामाजिकतेचे स्वरूप पाहू.

## २.५ दलित आत्मकथनांतील सामाजिकता :

भारतीय समाजव्यवस्थेच्या तळाशी खदखदणाऱ्या जातीव्यवस्था, अस्पृश्यता, अज्ञान, अंध:कार, श्रेष्ठकनिष्ठता, ह्या प्रश्नांनी बधिर झालेल्या, पिचलेल्या, एका प्रचंड समूह मनाचे प्रत्ययकारी दर्शन दलित आत्मकथनांत घडते. हेच या आत्मकथनांचे वेगळेपण आहे. एका व्यक्तीच्या चित्रणाबरोबर समष्टीचे चित्रण हे दलित आत्मकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. दलित आत्मकथनांमधून प्रथमत: सामाजिक व्यवस्थेवर परखडपणे मांडले विचार दिसून येतात. म्हणूनच आपल्या छळला ही समाजव्यवस्था व सवर्णांची मानसिकता कारणीभूत ठरली तशी आपल्या समाजाची मानसिकताही कारणीभूत ठरली ह्याचे चित्रणही दलित आत्मकथनकार करतो. म्हणूनच आपल्यावर झालेल्या अन्यायाचे, वेदनेचे प्रकटीकरण करून तो थांबत नाही तर त्याविरूद्ध विद्रोहाचे बंडही करून उठतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तीलढ्यातून या नवतरूणाला दिशा मिळाली.

साहित्याचे साधनात्मक मूल्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाणवून दिल्यामुळे 'स्वभान' आलेला हा 'मूकनायक' कथा, कविता व त्यानंतर आत्मकथन या द्वारे आपल्या व आपल्या समाजाच्या दु:खाचे चित्रण करून, सवर्णांची कानउघडणी करणारे लेखन करू लागला. दलित जीवनाचे सामाजिक, सांस्कृतिक,

आर्थिक आणि अन्य साऱ्याच बाजूने शोषण केले, गेले, 'माणूस' म्हणून जगण्याचे सारे हक्कच नाकारले गेले. अनुभवांना अक्षरबद्ध करत व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली सम्यक क्रांतीची सूत्रे मांडत दलित सहित्याने आपली वाटचाल सुरू ठेवली. दलित साहित्य ही एक सामाजिक व सांस्कृतिक घटना आहे. प्रत्येक मानवाला त्याचा समान हक्क मिळाला पाहिजे ही इच्छा धरणारे हे साहित्य आहे. माणुकीला काळिमा फासणाऱ्या सवर्णाच्या मानसिकतेविरूद्धचे हे युद्ध आहे. व अंतिमत: मानवी मूल्यांची मानवी जीवनात पुर्नस्थापना हे या साहित्याचे अंतिम ध्येय आहे. जीवनानुभवांचे परिवर्तनाभिमुख असे चित्र दलित आत्मकथनांमधून दिसते. हे चित्र अस्वस्थ करून सोडणारं, थक्क करणारं आहे. विविध जाती-जमातीमधील जीवन या आत्मकथनांमुळे समाजापुढे आले. यात महार, मातंग, चांभार, ढोर, कैकाडी, कुडमुडे जोशी उचल्या, बेरड, गोपाळ, कोल्हाटी, न्हावी, ख्रिस्ती आदी जातीजमातीची ही आत्मकथने त्यांची जगण्याची धडपड, त्यांचे झालेले शोषण त्या शोधण्यातून त्यांच्या वाट्याला आलेले भोग त्या - त्या समाजातील, अंधश्रद्धा, चालीरिती, दैन्य-दारिद्रय जगतानाचे आलेले कडवट अनुभव, प्रस्थापित समाजाने केलेले अन्याय, या जीवनातील बकालपणा, आंबेडकरी चळवळीने आलेली जागृती या साऱ्या बाबी या आतमकथनातून येतात.

व्यक्तिगत जीवनाबरोबरच सामूहिक वेदनेचे चित्रणही येते. या सर्व जातीजमातीतील लेखकांनी आपले जीवनानुभव चित्रित केले. यामधून महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे चित्र आपल्यासमोर उभे रहाते. लेखकाचे जीवन ज्या समाजघटकांशी संबंधित आहे. त्या अनुषंगाने ही अनुभूती व्यक्त होत असल्याने भोवती असलेला समाज, स्वाभाविकपणे व्यक्त होत असतो. दलित समाजाचे

आत्मभान एकट्या त्या आत्मकथनकाराचे नसून संबंध समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या समग्र मानवजातीचे आहे. अज्ञान, दारिद्रय, पिळवणूक नाकारत जाऊन एका बंदिस्त समाजातून खुला समाज निर्माण होऊन एक सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाची अपेक्षा दलित साहित्याला आहे. म्हणूनच दलित आत्मकथनांना त्या त्या लेखकाच्या 'समाजकथा' असेही म्हणतात. डॉ. सदा कऱ्हाडे यांचे मत येथे उद्धृत करावेसे वाटते. दलित साहित्याला एक सामाजिक प्रयोजन आहे. कारण दलित साहित्य ही एक अन्वर्थक अशी सामाजिक व सांस्कृतिक घटना आहे. म्हणून दलित साहित्याचा सामाजिक अर्थ लावण्याचा प्रयत्न आज ना उद्या होणे स्वाभाविकच आहे. समाजजीवनाच्या दृष्टीने राजकीय, धार्मिक, आर्थिक, वैचारिक, सांस्कृतिक असे सर्वांगीण दर्शन घडणे आवश्यक असते हे दर्शन चरित्र आणि आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारात अधिकांशाने घडते. कारण हे दोन्ही वाङ्मयप्रकार म्हणजे एका परीने त्या - त्या काळातील व्यक्तीजीवनाचे, समाजजीवनाचे ऐतिहासिक दस्तऐवज असतात. कथनातील मुख्य पात्र असे protagonist असते तसे त्याला विरोध करणारे, त्याच्याशी शत्रुत्व करणोर Antagonist असते. हे Antagonist कधी व्यक्तीच्या रूपात असतात, कधी परिस्थितीच्या रूपात असतात, कधी दुर्दैवाच्या रूपात असतात, कधी नैसर्गिक आपत्तीच्या रूपात असतात, कधी माणसाच्या विविध मनोवृत्तीत असतात तर कधी समाज अथवा समाजव्यवस्थेच्या रूपात असतात आणि माणसाचा सतत या Antagonist शी लढा चाललेला असतो. माणसाची जीवनकथा म्हणजे या लढ्याची कथा असते. दलित साहित्यात याच लढ्यातील शत्रुमित्रांची, यशापयशाची व या लढ्यातून प्राप्त होणाऱ्या श्रेयसप्रेयसाची कथा असते. अशाप्रकारे दलित साहित्यतून,

आत्मकथनांमधून समाजजीवनाच्या दृष्टीने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक असे सर्वांगीण दर्शन घडते.[६]

म्हणून दलित आत्मकथनामधली सामाजिकता महत्त्वाची ठरते. दलित साहित्य ही एक सामाजिक सांस्कृतिक घटना आहे. तसेच ती केवळ वाङ्मय चळवळ नसून ती एक जीवनदृष्टी आहे. प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, आत्मसन्मान निर्भयता देणारी ही मोलाची घटना आहे. माणुसकीच्या शत्रूविरूद्ध पुकारलेले हे एक युद्ध आहे.

आता आपण 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सामाजिकतेचे स्वरूप विशेष लक्षात घेऊ.

## २.६ 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' मधील सामाजिकता:

दलित स्वकथनामागे कलात्मकतेपेक्षा वैचारिकता अधिक आढळते. दलित लेखकांनी आपल्या भावानुभवाचा शोध व्यक्तिगत पातळीवर न घेता सामाजिक पातळीवर घेतला. प्रत्येक आत्मकथनांत अस्पृश्यता, भूक-दैन्य, जातपंचायत रूढी-परंपरा यांनी दबला गेलेला जीवन दिसून येतो. यातील माणूस जिवंतपणी सवर्णांकडून नागवला गेल्यामुळे दलित साहित्याने सामाजिक दृष्टिकोणातून समाजप्रबोधनाची भूमिका स्वीकारली. म्हणून दलित साहित्याला सामाजिक प्रयोजन आहे. यातील प्रत्येक घटकाचे समग्र विवेचन केले असता ते लक्षात येते.

### २.६ अस्पृश्यता :

दलितांच्या वाट्याला आलेले जे दु:खभोग आहेत. त्यात अस्पृश्यतेचा फार मोठा वाटा आहे. चातुवर्णावर आधारित समाजव्यवस्थेत अतिशूद्रांना अस्पृश्य

मानले. त्यांच्या सावलीचाही स्पर्श उच्चवर्णियांना चालत नव्हता. माणसाने माणसाचा स्पर्श नाकारावा ही केवढी अमानुष कल्पना या अस्पृश्यतेमुळेच दलितांची जीवने करपून केली. दलितांना जेव्हा आत्मभान आले तेव्हा त्यांना याची प्रकर्षाने जाणीव झाली. म्हणून अस्पृश्यतेविषयीचा कडवटपणा, राग, संताप त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त करणे सहाजिकच होते. अस्पृश्यतेमुळे भोगलेल्या दु:खाचे अनुभव जवळजवळ सर्वच आत्मकथनांत दिसून येतात. या अस्पृश्यतेचे चटके सर्वच दलित लेखक-लेखिकांना बालवयातच विशेषत: शालेय जीवनापासूनच मिळाले. जिथे बालमनात अनेक संस्कार होतात व उदयाची आदर्श व्यक्ती घडविली जाते तेथेच या दलित मुलांच्या मनावर भेदाभेद बिंबवला गेला. शांताबाईनी आपल्या आत्मकथनांत एक अनुभव सांगितला आहे. ''तिसरीच्या वर्गाला पाटीलमास्तर शिवायला हुतं त्यांनी आमाला बाहीर बसवल. ते आमाला शिवून घेत नसत. पोरांना जण शिवू देत नसत. आमचं काय चुकलं तर ते लांबनच छडी मारायचं. पाट्या तपासताना आमाला पाट्या खाली ठिवायला सांगायच. मास्तराला शिवलेल चालत नसायचं.'' (पृष्ठ क्र.६, ७) म्हणजेच दलित समाजाला उच्चवर्णीय समाजाने वाळीतच टाकले होते. ते दलित आहेत याची जाणीव ते सारखे करत असत. त्यावर छोटी नाजा (शांताबाई) आपल्या आईला म्हणजे, ''आये आपनबी मानूस व मास्तरबी मानूस मग मास्तर आपल्याला शिवून कसा घेत नाय ?''[६] (पृष्ठ क्र.६) 'माज्या जल्माची चित्तरकथा' मध्ये अशा अनेक प्रसंगातून अस्पृश्यता व्यक्त होते. बांगड्या भरताना विटाळ होतो म्हणून कासारीत घोंगडी नेसते. विहीर विटाळते म्हणून गोसाविण दलित स्त्रियांना पाणी भरायला नकार देते.

पंढरपूरला आईबरोबर जातानाही एक प्रसंग त्यांनी वर्णन केला आहे. भाकरी खाल्यावर पाणी प्यायला लागते. पण ती महाराची मुलगी आहे म्हटल्यावर ती पाणी भरणारी बाई म्हणजे, ''चल तू लांब बस तुला पानी वरनं वाडती'' (पृष्ठ क्र.२३) त्यानंतर देवळात जाऊ देत नाहीत म्हणूनही छोटी 'नाजा' प्रश्न विचारते. ''आपनाला देवळात जाऊ का देत नायती ? मग आपून पंढरपूरला कशाला आलूया ?''[९] (पृष्ठ क्र.२४) हिंदूच्या देवाप्रमाणे मुसलमानांच्या देवालाही महारमांगाचा स्पर्श चालत नसे. कारण पिराला मलिदाही शांताबाईना बाहेरुन दाखवावा लागतो. त्यानंतर शांताबाई मोठ्या झाल्यावर पुण्याच्या विमेन्स कॉलेजमधील एक सवर्ण मुलगीही अस्पृश्य मुलींनी वाढलेले जेवण घेत नसे. नंतर अत्रे बाईंनी तंबी दिल्यावर ती सरळ झाली. याचाही दाखला देतात. त्यावरून वर्षानुवर्षे सवर्णांच्या मुलांच्या मनातही दलितांबद्दल अस्पृश्यतेची व दलितांची जाणीव किती खोलवर रूजली होती हे लक्षात येते. लेखिकेच्या मुलीला मंगलला तिने तिच्या सवर्ण मैत्रिणीकडे हप्ताने पाणी घेतले म्हणून मैत्रीण म्हणते, ''मंगल तू महाराची आहेस. आई म्हणते मंगलने कशाला हात लावला तर देव बाटतो.''[१०] म्हणजेच काळ बदलला तरी लेखिका ज्या वयात शाळेतील जीवनात जे अस्पृश्यतेचे अनुभव घेते तेच अनुभव तिची मुलगी घेते. यावरून अस्पृश्यतेचे किती विदारक चटके दलितांनी सोसले हे लक्षात येते.

असाच अनुभव बेबी कांबळे सांगतात, तो महारणींनी आणलेल्या लाकडाच्या मोळी (बिंड) बाबतचा आहे. बाह्मणांची बाई त्यावेळी बजावत असे, ''ऐका महारणीनो, लाकड नीट तपासा बरं का एकदा चुकूनमाकून त्याला दोरा-बिरा चिकटून येईल आणि सगळाच घोटाळा होऊन जाइल. तुम्हाला काय त्याच ? पण

विटाळलेलं घर आम्हाला सारवावं लागेल. चिंध्या बिंध्यांसहित सगळं धुवावं लागेल. अग, देवादिकांना तरी हे चालणार कसं ? देव विटाळतील ना ? म्हणून म्हणतेच, तुम्ही त्या लाकडाला काही ठेवू नका.'' (पृ.क्र.५४)[११] येसकरकीचे वर्णनही दोन्ही आत्मकथनांत आढळते. शांताबाई त्याला 'तराळकी' शब्द वापरतात तर बेबीताई त्याला येसकरकी म्हणतात. या येसकरकीचे वर्णन बेबीताईंनी आपल्या आत्मकथनांत विस्तृतपणे केले आहे. या येसकरांने गावच्या पाटलाकडे अतोनात कष्ट करायचे अगदी लाकूडफाडा आणणेपर्यंत संडास धुवेपर्यंत पण त्या येसकराचा आवाजही कानावर पडू नये. म्हणून त्याच्या हातात खुळखुळ्याची काठी द्यायची, त्याचा स्पर्शही घ्यायचा नाही. म्हणून बेबीताई संतापाने म्हणतात, ''अहो, हा तुमच्या वैभवाचा उपभोगच मुळी महाराच्या हाडामासांच्या रक्ताघामाच्या रसाचा आहे.'' महारणीच रक्त, घाम त्या कष्टावर गळलेले चाल असे पण त्या महारणीचा स्पर्श सवर्णांना चालत नसे. त्यापुढे म्हणतात, ''त्याचं रक्त पिऊन त्यांच्या दुःखावर आपल्या सुखाची शेज करता तो विटाळ तुम्हाला नाही का ?''[१२] (पृष्ठ क्र.५५)

यावरून विटाळ चांडाळाच्या कल्पना किती तीव्र होत्या ह्या प्रसंगातून लक्षात येते. दलित आत्मकथनास सवर्णांनी आपल्याला वाळीत टाकले. आपला काहीही अपराध नसताना पशूपेक्षाही हीन दर्जाची वागणूक मिळाली याविषयी चीड दिसते. बाबासाहेबांनी खरे जीवन दाखवले, माणूस म्हणून नवी ओळख करून दिली. त्याच्याविषयी शांताबाई लिहितात, बाबासाहेब सांगत, अस्पृश्यानों जागे व्हा, घाण कामे करू नाक.'' (पृष्ठ क्र.८८) म्हणून बाबासाहेबांच्या शिकवणुकीमुळे अन्यायाच्या विरोधात उभे रहाण्याची ताकद मिळत गेली. हे दलितांच्या आत्मोद्धाराच्या वाटचालीचे चिन्ह होते.

## २.६ २) भूक आणि दारिद्रय :

दलितांनी लिहिलेली आत्मकथन म्हणजे मानवी जीवनाच्या इतिहासात माणसानेच माणसावर कलेल्या लांच्छनास्पद अनुभवांचा कबुलीजबाब होय. सवर्णांचे विश्‍व व दलितांचे विश्‍व यातील निराळेपण हे त्यांच्या इतिहासातील सामाजिक व सांस्कृतिक अशा विविध स्तरांवरून लक्षात येते. 'भूक व तहान' हे दोन शब्द दलितांच्या सामाजिक इतिहासात महत्त्वाचे ठरतात. कारण येथील प्रत्येक दलिताने घोटभर पाण्यासाठी एकवेळ निवाऱ्याशिवाय राहू शकेल पण अन्नाशिवाय कसा रहणार ? पण या समाजाला गावाने गावकुसाबाहेर ठेवल्यामुळे शिक्षण नाही, उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळेच पोटाची खळगी भरण्यासाठी चार घरी भीक मागायची व आपले कुटुंब चालवायचे. या भूकेचे व ही भूक भागविण्यासाठी कराव्या लागणलेल्या संघर्षाचे वर्णन प्रत्येक आत्मकथेत दिसते.

ही भूक माणसाला काहीही करायला शिकवते. कधी चोरी तर कधी लाचारी, कधी संताप तर कधी सोशिकपणा, कधी निर्लज्जपणा तर कधी नाईलाजाने नीती गुंडाळून ठेवावी लागते. दोन्ही आत्मकथनांत या भुकेचे वर्णन आले आहे. शांताईनी आपल्या आत्मकथनांत असाच एक प्रसंग लिहिला आहे. एका पावसाळ्यात केवळ चूल पेटवायला वाळलेले जळण नाही म्हणून घरातली सर्व उपाशी झोपली. बाळंतीण होऊन केवळ बारा दिवस झालेली लालू म्हारीण भुकेची आग विसवायला रामा चौगुल्याच्या मळ्यात कणस चोरी करते. खर बाळंतीणीला कळास ही खायला देत नाहीत पण गरीबीपुढे लाचार झालेली व भुकेने कंगाल झालेली लालू म्हारीन तेही करते. मळेवाला दम देऊ लागल्यावर ती म्हणते, ''मी बारा दिसाची बाळंतीण पोटात भुकेने आग पडलीया. काय माती खावं का ? म्हणून

मकंची कणसं खातीया. का यकरायच ते करा.''[१४] (पृष्ठ क्र.३५) लेखिकेची भाची गोमूही सासू पोटभर खायला देत नाही म्हणून पळून येते.

भूक भागविण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे, मळणी चालू असताना बैलं जी कणसं खातं ती कणसं रोगावाटं तशीच पडत ते शेण गोळा करून घरी आणायचे व शेण पाण्यात विरघळून गेल्यावर त्याज्वारीची वाळवून,दळून भाकरी करायची. लेखिकाही अशा भाकरी खात असे. भुकेपुढे, धर्म, रीती, स्वच्छता, चांगले, वाईट या कशाचाच विचार उरत नाही. उरते फक्त 'वीतभर पोटाची खळगी' अन्न नसल्याने माणसे उपाशी मरत त्यामुळे त्यांना अनेक रोग होत. बेबी कांबळे म्हणतात, महारवाडा म्हणजे अठराविश्व दारिद्रयाचा कळस, त्यातच साथीच्यारोगाची भर पटकी व प्लेग यांना महारांची फार आवड रोगराईने ग्रस्त झालेला समाज, न औषध, ना उपचार. इतकचं काय तर पोटभर अन्नही नाही. बाई बाळंतिण झाली तर रिकामा पडलेला पोटाचा खड्डा भरायलाही अन्न नाही. उपाशीपोटी खायच काय तर निवडुंगाची बोंड. बायका पोरं म्हातारी माणस उपाशी पोटी फुकट मिळणाऱ्या त्या बोंडावर तुटून पडत. पण ती दुसऱ्या दिवशी बोंड पोटात गच्च बसल्यामुळे त्रास होतो. पण गरीबीमुळे उद्याचा त्रास विसरून ही आजचा दिवस निभावतात.

एखादे जनावर मेले ही महारवाड्यातली माणसे त्यावर तुटून पडत. गावातील सगळ्या महारांचा तो दिवस आनंदाचा जाई. आपल्याला मिळेल त्या मासांवर महारं तुटून पडत. अनेक दिवसांच्या उपासामुळे ते मांस शिजण्याएवढाही धीर नसे. माणसात आणि पशूंच्यात काय फरक होता ? असे वर्णन वाचल्यावर वाटते, कधी कधी उपासाने हैराण झाल्यावर सगळ्यांच्या संगनमताने एखाद्या म्हशीला विष घालून मारले जाई व आपली भूक भागवली जाई. या सर्वांतून जाणवते ती मानवी

जीवनातील 'भूक' ज्या भुकेने दलितांना माणसापेक्षाही पशुवत जीणं जगायला भाग पाडलं. त्या भुकेने माणसाला माणूस असूनही जनावरांसारख जीणं जगायला लावलं. वितभर पोटासाठी विविध प्रसंगानाच नव्हे तर जीवनात अतिशय हीन मानल्या जाणाऱ्या गोष्टींनाही कसे तोंड द्यावे लागले याची जाणीव या आत्मकथनांमधून येते. येथे 'भूक' या संकल्पनेशी सामाजिक विषमता, जातीयवाद, समाजात खालच्या दर्जाची दिलेली वागणूक याचा संदर्भ येतो. मेलेल्या, रोगराईला बळी पडलेल्या जनावरोच मांस खायची वेळ येते, जनावरांचे शेण धूवून त्यातील ज्वारीची भाकरी खायची वेळ येते. लग्नाच्या पंक्तीतील उष्टे खरकटे भरून घेऊन ते महारवाड्यात नेऊन त्याची वाटणी करून खायची वेळ येते. दलित आत्मकथनांतून जातिव्यवस्थेसंबंधी चीड संताप, अगतिकता घृणा दिसते याची अनेक कारणे आहेत. पण महत्त्वाचे कारण आहे भूक-उपासमार.

अस्पृश्यता, गरीबी, अज्ञान-भूक या एकापेक्षा एक आघातांनी सवर्णांना दलितांना पिळवटून काढले. कधी अपमान, कधी लाचारी प्रसंगी मारही दलितांनी खाल्या वीतभर पोटाला सतत जागृत ठेवण्यासाठी सवर्णांमुळे सतत लाचारी स्वीकारावी लागली. म्हणून वर्णवर्चस्व गाजवणाऱ्या सर्वांच्या विरूद्ध विद्रोह, प्रक्षोभ, शोषित व्यथा वेदना हे अतिशय समर्पक बोलीभाषेत दलित आत्मकथाकारांनी आपल्या आत्मकथनांतून मांडल्या.

भुकेप्रमाणे गरीबी-दारिद्र्य हा ही दलित जीवनाचा एक शाप होता. खायला पोटभर अन्न नाही व नेसायला अंगभर कपडा नाही हे सत्य दलित जीवनाचे होते. अगदी वयात येईपर्यंत दलितांची मुले नग्नावस्थेतच असत. मुली वयात आल्या की त्यांना लाज झाकण्याएवढे कापड मिळत असे व पुरूषांना फक्त कमरेएवढे वस्त्र.

अशा गरीबीस अज्ञानाच्या बुजबुजाटात ही मूल लहानाची मोठी होत व आपल्या गरीबीचा वारसा पुढे चालवत. म्हणून बेबीताई उपरोधाने एके ठिकाणी म्हणतात, ''ब्रह्मदेवाने सगळ्या महारांच्या नशिबी एकच शिला मारला'' सगळ्याच दलित समाजाची ही दुर्दशा होती. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांपासूनही सवर्णांनी वंचित ठेवल्यामुळे बिन शेपटाच्या पशुसारखे जीवन दलितांना जगावे लागले.

## २.६ ३) अंधश्रद्धा :

शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे दारिद्रय, अज्ञान व अंधश्रद्धा दलितांच्या पाचवीलाच पुजलेली होती. लेखिकेच्या (शांताबाईच्या) आईला मुल झाल नाही म्हणून पंढरपूरच्या वाऱ्या करण्याचे ती मान्य करते व लेखिकेचा जन्म होतो. म्हणून लेखिकेची आई वर्षातून चारवेळा पंढरपूरच्या वाऱ्या करते. बेबीताईंची भावंडही जगत नाहीत. म्हणून बेबीताईंची आजी काळूबाईला नवस बोलते व बेबीताई जगतात. अशाप्रकारे दोन्ही आत्मकथनांत मुल जगण्यासाठी केलेले नवस दिसतात. आजारी पडल्यावर डॉक्टरकडे न नेता. भगत पोतराज यांच्याकडून उपचार कले जातात. शांताबाईंची आई आजारी पडल्यावर तिला योग्य औषधोपचार करण्याऐवजी देवरूपाला दाखवून गंडा-दोरे, मंत्रतंत्र केले जातात. तरीही गुण येत नाही तेव्हा जावयाने करणी केली असे ती म्हणत रहाते. 'माज्या जल्माची चित्तरकथा' मधील सदा पोपटाने भविष्य सांगितल्यावर आठ दिवसाचे मरणार म्हणून झुरू लागतो. स्वत: लेखिकाही मूल्य जगावीत म्हणून शेखसलीम चिस्तीला नवस करते. याशिवाय भीक मागून मुदी करणे, मुलाच नाक रक्तात टोचणे, पाच फकीर जेवायला घालणे, मुलाला नाथवाच्या देवळात सज्जावरून उधळणे इ. नवस मुलं जगण्यासाठी करते.

15419

बेबी कांबळे यांनीही आपल्या आत्मकथनांत अंधश्रद्धोचे अनेक दाखले दिले आहेत. बेबीताई स्वत: लहान असताना त्यांना मेली आहे असे समजून पुरण्याची तयारी सुरू होते. पण त्यांची हालचाल जाणवल्यावर देवाची कृपा म्हणून जल्लोष केला जातो. म्हणून बेबीताई म्हणातात, ''घोर अंधारात, अज्ञानात मुले मेल्यासारखी वाटतात. त्यामुळे अंधविश्वासाने कितीतरी मुले निम्या अवस्थेत गाडली गेली असतील !''[१५] (प्रस्तावना) बेबी कांबळे यांनी महार समाजातील आषाढ महिन्याचे उदाहरण दिले आहे. बारा महिन्यापैकी एकच महिला महाराच्या जीवनात आनंदाचा असायचा. आषाढातील अमावस्येला रेड्याचा बळी दिला जाई व त्याजागी दुसरं लहान रेडं उभ केल जाई.मोठ्या रेड्याचा बळी दिल्यावर साऱ्या महारवाड्यात त्याच मांस प्रसाद म्हणून खालं जाई. या सर्व गोष्टीत महार समाज लडबडून गेला होता. मुलाला याचवेळी पोतराज म्हणूनही तयार केले जाई. भीक कशी मागायची शिकवली जाई. हिंदू समाजाने अंधश्रद्धेला खतपाणी घालणारी ही संस्कृतीच कारणीभूत होती. काही रीतीरिवाज इतके अंधश्रद्धा होती तरीही ते अज्ञानापोटी पाळले जात. उदाहरणार्थ बाळंतिणीला पाच पालव्यांचा प्रसाद म्हणजे रेड्याचे पाच प्रकारचे अवयव शिजवून खायला घातले जात. इतके घृणास्पद जीवन गावकुसाबाहेरची ही माणसे जगत होती.

त्यांच्या या निष्क्रिय व पशुहीन जीवनातून त्यांना जागे केले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या समाजाला माणसात आणले ते बाबासाहेबांनी स्त्रिया ह्या परंपरेच्या गुलाम असतात. अंधश्रद्धेपोटी अनेक परंपरांचे पालन त्या करतात. म्हणून स्त्रिया शिकल्या पाहिजेत यावर बाबासाहेबांचा भर होता. दलित समाज हा

सर्व समाजापासून वेगळा नव्हता पण हिंदू समाजाने त्यांना वेगळे पाडले व हा समाज वर्षानुवर्षे अज्ञान व अंधश्रद्धेच्या खाईत लोटला गेला.

## २.६ ४) समाजजीवन स्त्रीजीवन :

कोणत्याही आत्मकथनांतून त्याच्या जीवनाचा जसा परिचय होतो त्याप्रमाणेच तत्कालीन काळाचाही परिचय होतो. या आत्मकथनांत शांताबाई कांबळे यांनी बालपणापासून ते सेवानिवृत्तीपर्यंतचा कालखंड उलगडून दाखवल्यामुळे त्यांच्या आयुष्यातील बदलत गेलेले समाजजीवनही चित्रित झालेले आहे. त्या काळात जातीनुरूप भरणाऱ्या शाळा, तेथे पाळली जाणारी अस्पृश्यता, शिक्षणाविषयीची उदासीनता शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षा यात झालेले बदल त्या लिहितात, लग्नविषयक बोलणी, लग्नातील विधी व कार्यक्रम यांचे स्वरूपही आज बदलले आहे. धर्मश्रद्धा आणि अंधश्रद्धा देवधर्म, नवससायास हे अजूनही आढळतात. पण यात बराच फरक आढळतो. विशेषत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयानंतर आणि त्यातही धर्मांतरानंतर बदललेली दलितांची मानसिकता अभ्यासण्यासारखी आहे. आजही खेड्यातून दलित कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना सवर्ण वस्तीत रहायला घर मिळत नाही. शांताबाई कांबळे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून चार्ज घेतात. तेव्हा तेथे उपस्थित असलेले पाटीलसाहेब शिक्षकांना घर पहायला सांगतात तेव्हा ते शिक्षक म्हणतात, ''गावात चांगल्या खोल्या नाहीत. बौद्धवाड्यात चांगल्या खोल्या आहेत.''[१६] मात्र शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात आपल्या शेजारच्या खुर्चीवर कांबळेबाईंना बसायला सांगणाऱ्या पुरोगामी विचाराच्या पाटील साहेबांच्या निमित्ताने या मानसिकतेत घडणाऱ्या परिवर्तनाचे दर्शनही लेखिका घडवते.

दलित स्त्री म्हणजे दलितांहूनही दलित. दलीत स्त्रीने केलेला संघर्ष हा दोन स्तरावर होता. प्रथम ती उच्चवर्णियांकडून नाडली गेली व दुसरी कुटुंबाकडून शोषली गेली. म्हणजे सामाजिक मानसिक, शारीरिक पातळीवर दलित स्त्री शोषणमय जीवन जगत होती. पुरूषप्रधान संस्कृतीने तिची मानसिक व शारीरिक स्तरावर लढाई सुरू होती. लग्नाआधी कांबळेमास्तरांचे कुणा बाईशी संबंध होते. लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर ती फसवली गेलेली बाई आली होती. पण तिला दमदाटी करून हाकलून दिले. म्हणजेच पुरूषाने काही केले तरी चालत होते. शांताबाईच्या सासऱ्यानीही आपल्या दोन्ही बायकांचा छळ करून सोडून दिले होते. म्हणजेच बायकोला बाजारातल्या वस्तू इतकी किंमत नाही. हेच शांताबाईंचे पती बायकोला दिवस गेले असताना तिच्या इच्छेविरूद्ध मामीच्या आग्रहावरून तिच्या विधवा मुलीशी दुसरा विवाह करतात. पण शांताबाई अतिशय संयमाने, हिंमतीने या प्रसंगाला तोंड देते. नवऱ्यापासून विभक्त रहाणाऱ्या स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोनही त्या 'कोंडीबा कांबळे' या व्यक्तिरेखेतून चित्रित करतात.

'बेबीताई कांबळे'यांनी आपल्या आत्मकथनांत 'स्वपेक्षा' समाजजीवनाला जास्त महत्त्व दिल्यामुळे त्यांच्या वैयक्तिक जीवनावर प्रकाश पडण्यापेक्षा याच पन्नास वर्षापूर्वीच्या महार समाजाचे चित्रण अधिक आढळते. आपण लेल्या आयुष्याच्या निमित्ताने आपल्या समाजाचे सर्वांगीण चित्र रेखाटण्यात त्यांना अधिक स्वारस्य आहे. म्हणूनच त्यांच्या जन्मापासून ते या आत्मकथन लेखनकाळातील त्यांचा समाज आणि त्या समाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयानंतर झालेली परिवर्तने, त्यांचा परिणाम, डॉ.बाबासाहेबांच्या पश्चातचा समाज यांचेही चित्र या आत्मकथन उमटलेले दिसते. अठराविश्व दारिद्रयात, अंधश्रद्धेत गुरफटत गेलेला

समाज त्यांनी वर्णन केला. अशा घरातील बायकामुल यांचेही त्या वर्णन करतात. वर्षभर अंगाला पाणी नाही. एकेका घरात आठ-दहा पोरांची रास त्यांची स्वच्छता करण्याचे ज्ञान नाही. त्यामुळे, उवा-लिखाचे हुळूटळाहू, शेंबडाचे नळ, मातीचे ओघळ असे शब्दप्रयोग बेबीताई वापरतात. त्यात किळस, घृणा असली तरी तेच सत्य त्यांच्या समाजाचे होते. येसकरकी, पोतराज, आषाढातील जत्रा या अंधश्रद्धेपायी महार समाज अधिकाधिक निम्नस्तरावरील आयुष्य जगत होता. मेलेले ढोरं खावां हा सर्वच दलित आत्मकथनांत आढळणारा प्रसंग. दोन्ही आत्मकथनांत दिसतो.

दारिद्र्यातही महारवाड्यात चर्चा चालत त्या अंगात येण्याच्या सवागे येण्याच्या, यातच त्यांना फुशारकी वाटे. यावर बेबी कांबळे म्हणतात, ''खरोखर त्यांच्या जीवनात जगण्यासारख होतेच काय ? कुठतरी मानसाला मन गुंतवायचं, कशात तरी रकून आशेच रोपट उंचवायच असत. त्यामुळे आषाढाचा महिना म्हणजे तत्कालीन महारजातीला महत्त्वाचा वाटे. भाकरी मागून खाणाऱ्या येस्कराची काठो म्हणजे त्यांना राजदंड वाटे. इतके अज्ञान या समाजात पसरलेले होते. जर एखादा शहाणा माणूस जर दुसऱ्याला त्याची मूल्य शिवायला जात असेल तर पुढील उत्तर त्याला मिळे, ''बस कर तुज पाद्री ग्यान, आरं, पोरंबाळ शिकून कायत्याला मास्तर बिस्तर करायच है न्हय.''[१७] (पृष्ठ क्र.६६) असा हा परंपरेचा वेडा अभिमान आणि घोर अज्ञान नष्ट झाल्याशिवाय समाज सुधारणार नाही हेच बेबी कांबळेना या उदाहरणातून घायचे आहे. निवडुंगाची बोंडे काय, शिळेपाके अन्न किंवा ढोरवाडीवर टाकलेली पड याचे त्यांना अप्रूपच वाटे. अशा या भयाण जगण्याचे चित्रण बेबीताई जिवंतपणे वाचकांसमोर उभे करतात. असे भयाण जिणे जगणाऱ्या माणसांच्या

स्वभाववृत्तीचे दर्शन घडवतात. त्यांची मानसिकता काय कशी या सर्वांना शोषणाला जबाबदार होती हे स्पष्ट करतात.

आपल्याा समाजाचे हे अपार दारिद्रय, अंधश्रद्धा आणि धर्मभोळेपणा, अज्ञान एकूण लाचार आणि अपमानित जगणे ज्या ज्या चित्रमय पद्धतीने चितारतात अर्थात त्यांना आपल्या समाजाविषयी तळमळ आहे. धर्म आणि त्याच्या रूढ कल्पना, परंपरागत चालत आलेले आचार-विचार, देवदेवतांचे अवास्तव व विकृत स्तोम त्यांचा पृथाभिमान याविषयी त्यांना खंत वाटते आणि चीडही येते. त्यांच्या आत्मकथनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आत्मकथनाच्या निमित्ताने तत्कालिन दलित स्त्रियांच्या अवस्थेचे, त्यांच्या यातनामय आयुष्याचे दर्शन त्यामधून घडते. देव, धर्म आणि त्याविषयीच्या भ्रामक कल्पना, सामाजिक जाचक रूढी यात पिळून, भरडून निघणाऱ्या स्त्रियांच्या जीवनाविषयी त्यांनी आधिक्याने माहिती दिली आहे. उदा. मुलगी पाच-सहा वर्षाची झाली नाही. तोच तिचे लग्न, नवरा म्हणजे काय हे कळायच्या आत ती सासरी येई. सासरी सर्वांचा स्वयंपाक करणे, भल्या पहाटे उठून दळण दळणे, नदीवर जाऊन घागरीवरून पाणी भरून आणणे इ. कामे करावी लागत. यात थोडीशी जरी चूक झाली तरी त्यात क्षमा नसे. ती वयात आल्यावर नवरा-बायको एकत्र येणार नाही याची काळजी घेतली जाई. इतक्या छळाला कंटाळून एखादी ही लहान सासुरवाशीण पळून गेली तर तिला खोडा अडकवत. या खोडा अडकवलेल्या स्थितीतच तिला सर्व कामे करावे लागे. मुख्यत/ स्त्रियांच्या छळाला स्त्रियाच कारणीभूत ठरत. चारित्र्यावर संशय घेऊन मुलाला सुनेविषयी भडकवून सुनेचे नाक कापले जाई. अशा स्त्रीला कुणीही नातलग जवळ करत नसत. अशाप्रकारे, गरिबी, अज्ञान व सामाजिक व कौटुंबिक

पातळीवरील शोषण या सर्वांतून जर एखादी स्त्री जगली वाचली तर निसर्गाने दिलेल्या बाळंतपणाचा तिला सामोरे जावे लागे. त्या बाळंतपणात इतरांच्या अज्ञानापोटी त्या नवथर मुलीला अतिशय हाल सहन करावे लागे. या हालांचे वर्णन ऐकूनही शहारे येतात. या यातनामय जिण्याचे दर्शन बेबीताईंनी दाखवून दिले. अशाप्रकारे दोन्हीआत्मकथनांचा अभ्यास केला असता. त्या-त्या काळातील समाजजीवनाचा व स्त्रीजीवनाचा आलेख आपल्यासमोर उभा रहातो. बेबीताईंनी तत्कालीन स्त्रीजीवन मांडताना कोणतेही भाष्य न करता फक्त अनुभव मांडण्याचे काम केले. पन्नास वर्षापूर्वी दलित स्त्रीचे जीवन व आपल्या समाजाचे जीवन यांचे डोळसपणे व सहानुभूतीपूर्वक निरीक्षण बेबीताईंनी केले.

दलितांना प्रस्थापित समाजव्यवस्थेने शूद्र लेखून त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले. स्त्री म्हणजे तर पायाची दासी. ती जणू निर्जीव वस्तू समजून तिला या समाजव्यवस्थेने वागविले . सतत राबणारी, नवऱ्याच्या सुखात सुख मानणारी, अहोरात्र त्याच्या सावलीसारखी सोबतकरणारी, फाटक्या-तुटक्या संसारात सुख मानणारी आहे. तरीही शांताबाई सारख्या शिकलेल्या बाईलाही पुरूषी वृत्तीला बळी पडावे लागले.

## २.६ ५) विद्रोह :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघटनात्मक चळवळीतून आणि वास्तव स्थितीच्या कोंडवाड्यातून मुक्त झालेल्या दलित जीवनाला अक्षर ओळख मिळाली आणि दलित समाजाला परिवर्तनाची नवी दिशा मिळाली. विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेने लादलेले जीवन जेव्हा मानवनिर्मित आहे याची जाणीव झालेला दलित समूह नकाराची, विद्रोहाची भूमिका घेऊ लागला. वर्णाधिष्ठित

समाजव्यवस्थेत सर्वच जनजातीत कांही 'फुले', 'आंबेडकर' जन्माला आले नाही. पण फुले आंबेडकरांच्या तत्त्वविचारांनी सगळ्या जनजाती जागृत झाल्या याचे उदाहरण म्हणजे अध:स्तरावरील वर्षानुवर्षे शोषित जीवन जगणाऱ्या स्त्रियाही आपले अनुभव मांडू लागल्या. एकीकडे स्वत:च्या समाजाला आपल्या लाचार व अगतिक जिण्याचे भान जाणून दिले आणि दुसरीकडे व्यापक समाजव्यवस्थैतील साऱ्या उणिवा ठसठशीतपणे रेखाटून तिला शरमिंदे केले. या दोन हेतूने विद्रोहाची भावना प्रखर झाली. शांताबाईच्या लेखनात याचे संदर्भ सापडतात. १९४३ साली १५ जानेवारी रोजी डॉ. आंबेडकरांचे सोलापूर येथे भाषण झाले. तेव्हा प्रथम लेखिकेने त्यांना पाहिले. दीक्षा घेतल्यावर जी विद्रोही भूमिका घेतली त्याचे वर्णन शांताबाई करतात. ''लोकांनी त्या दिवसापासून ठरविले कुळवाड्याचे मेलेले जनावर ओढायचे नाही, गावकीची कामे करायची नाहीत. माणूस मेलेल्याची खबर परगावी द्यायची नाहीत.'' [१८]

१९६२ साली करगणीच्या लोकांनी तरस मारून गावात आणला. त्याची गावभर मिरवणूक काढायचे ठरले. तेव्हा तेथील गाववाल्यांनी बौद्धवाड्यातील लोकांना बोलावून तरस मेलेली बैलगाडी ओढण्यास सांगितले पण त्यांनी नकार दिला. म्हणून गावकऱ्यांनी बौद्ध समाजावर बहिष्कार टाकला. मळ्यात दलितांनी आपली विद्रोहाची भूमिका कायम ठेवली. कासारीण दलित स्त्रियांना बांगड्या भरताना विटाळ होतो म्हणून घोंगडी नेसत असे. दलित स्त्रियांनी तिच्यावर बहि:ष्कार टाकला. यातून पारंपरिक अन्यायाविरूद्ध दलित मन कसे बंड करून उठते हे लक्षात येते.

डॉ. बाबासाहेबांनी दलित समाजाला ज्ञान व नैतिक बळ दिले. ज्या धर्माने आणि संस्कृतीने आपल्याला युगानुयुगे माणुसकीपासून वंचित ठेवले त्या संस्कृतीला नकार आणि तो धर्म संस्कृती जपणाऱ्या प्रस्थापितांविरूद्ध विद्रोह हे दलित साहित्याचे एक वैशिष्ठ्य आहे. अन्याय, छळ, वेदना सोसणाऱ्या दलितांच्या मनात विद्रोहाच्या ठिणग्या धर्मांतरानंतर पेटल्या. त्याचे उदाहरण बेबीताईंनी दिले आहे. काळाराम मंदीर प्रवेश बाबासाहेबांनी केल्याबरोबर बेबीताईंचे भाऊ व त्यांचे मित्र यांनही तेथीलदेवळात प्रवेश केला. फलटणमधील दोन्ही हॉटेलात महारांना प्रवेश नव्हता. तेथेही मुलांनी घुसखोरी केली. त्याचे वर्णन बेबीताई करतात, ''जशा जशा बाबा आज्ञा देतील तसतशा जनतेन जीवाची पर्वा न करता अमलात आणल्या. बाबांचे शब्द प्रमाण मानले. बाबांची अमरवाणी हेच आत्म्याचे रूप.''[१९]

अशाप्रकारे आपल्या समाजाला आत्मभान यावे म्हणून प्रत्येक दलित आत्मकथनकाराने आपल्या व्यथा मांडल्या. त्यातून नकार, विद्रोह तर दिसतोच पण सगळ्यात जास्त जी गोष्ट लक्षात येते ती म्हणजे अंतिमत: यातून मानवतावाद प्रस्थापित करणाऱ्या प्रत्येक लेखक-लेखिकेचा प्रयत्न आहे. अंधारातून प्रकाशाकडे जाणारे हे साहित्य आहे व हा मार्ग दाखवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांनी उभारलेली दलित चळवळ. या दोन गोष्टी ज्यांनी दलितांना परंपरेला नकार व प्रस्थापितांविरूद्ध विद्रोह करायला लावला त्याबद्दल कृतज्ञता इतर आत्मकथनांप्रमाणे या दोन्ही आत्मकथनांत दिसते.

## २.७ दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतील सामाजिकतेचे विशेष :

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतील सामाजिकता व सांस्कृतिकता दलित स्त्रिया ज्या काळात जगल्या,वाढल्या त्या परिस्थितीच्या अनुषंगाने आपल्यासमोर

येते. या आत्मकथनांमधून ज्यावेळी समाजदर्शन, स्त्रीजीवन, दलितत्त्व समोर आले. तेव्हा ती वेदना, ते भोग, ते चित्रण साऱ्या समष्टीचे झाले. या आत्मकथनांमधून प्रथमत: सामाजिक व्यवस्थेवर परखडपणे विचार मांडलेले दिसतातच. ही व्यवस्था, उच्चवर्णीय मानसिकता जशी आपल्या छळाला कारणीभूत झाली तशी आपल्या समाजाची मानसिकताही कशी कारणीभूत झाली हेही दोन्ही आत्मकथनांतून दिसून येते. स्त्रीच बहुतांशवेळा स्त्रीच्या दु:खाला कारणीभूत झत्तली. हेही दोन्ही आत्मकथनांतून दिसून येते. स्त्रीच बहुतांशवेळा स्त्रीच्या दु:खाला कारणीभूत ठरली याचा प्रत्यय दोन्ही आत्मकथनांतून येतो. 'माज्या जल्माची चित्तरकथा' यामधून शांताबाई कांबळे यांनीआपली कहाणी सांगत असताना आपल्या अनुभवातूनच समाजजीवनाचे दर्शन घडविले. त्यांच्या समाजजीवनातल्या वृत्तिप्रवृत्ती, चालीरिती, रूढीपरंपरा, धर्मश्रद्धा, अंधश्रद्धा यांचे जे परिवर्तन त्यांच्या अनुभवातून झाले होते त्यातूनच या सगळ्याचा प्रत्यय येतो. काळानुसार परिस्थिती बदलते. परिस्थितीनुरूप समाज वाचतो आणि माणूसही बदलतो. हा बदल स्वतंत्रपणे विशद करून न सांगता अनुभवातून प्रत्ययकारी केला तर साहित्यकृतीला बाधा येत नाही. शांताबाईंच्या आत्मकथनता जो कालपट निर्देशित होतो तो पूर्णपणे परिवर्तित झाला आहे असे नाही. पण त्या काळात परिवर्तनाची प्रक्रिया निश्चितपणे सुरू झाली होती.

एकूण दलित साहित्याला 'सामाजिकता' हे विशेष अंग आहे. कारण सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी दलितांना संघर्ष करायचा आहे. म्हणून त्यांनी वर्णव्यवस्थेविरूद्ध विद्रोहाची भूमिका घेतली. समाजपरिवर्तनासाठी विषमता दूर होणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे सवर्णांची मानसिकता बदलणेही गरजेचे होते. आत्मप्रकटीकरणाचा ह्या हेतूनेच दलित आत्मकथने लिहिली गेली. शांताबाईंनी

आपल्या समाजावरील अन्यायाचे चित्रण केले. पण अतिशय संयमीपणे याचे कारण लेखिकेने जे जे कथन केले ते तिच्या जीवन कर्तृत्त्वाचे अनुभवसत्यच आहे व हे सत्य तिने जन्म घेतलेल्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीतील बदलाचे आहेत म्हणूनच तिच्या अनुभवसत्यात एका कालखंडाच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन घडून येते. गावगाड्यातील स्थानामुळे अस्पृश्य नेहमीच काळाच्यामागे राहिला. काही विशिष्ट जातीच्या मनोवृत्तीमुळे त्या समाजाने गुहाजीवन जगले. याचे प्रत्यंतर इतर दलित आत्मकथनांप्रमाणे दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतूनही येते. दलित स्त्रियांच्या बाबत विचार करता आपल्या असे लक्षात येते, थोड स्थैर्य मिळाल्यावर थोडी शांतता मिळाल्यावर आपण जे भोगल, अनुभवल ते सांगून मन हलकं कराव ही उर्मी दिसून येते. शांताबाईंनी तर म्हटलेच आहे की, समकालीन शंकरराव खरातांचे आत्मचरित्र वाचल्यावर आपल्याही जीवनात असेच किंबहुना याहूनही भयंकर काही आहे. ते लिहिले पाहिजे अशा आंतरिक उर्मीतून त्यांनी लिहिले.

एक स्त्री म्हणून लहानपणापासून ते वृद्धापकाळापर्यंत अनेक, प्रसंग, घटना, आर्वतने यातून तावून सुलाखून बाहेर पडल्यावर स्वत:विषयी, पतीविषयी स्वत:च्या संसारातील भल्याबुऱ्या अनुभवाविषयी स्त्रीच्या मनात अनेक आंदोलने असतात. या आंदोलनाला जेव्हा मूर्तरूप येते तेव्हा त्याला 'शब्दांचा साज' चढवला जातो व 'मी', 'आम्ही' चे एकत्रीकरण येऊन ही स्वकथने लिहिली जातात. या आत्मकथा एकट्या व्यक्तीच्या नसतात तर संपूर्ण समाजजीवन त्यात असते. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचा विचार करता यातील समाजजीवन दारिद्रयाने पिंचलेले आणि गरिबीने विकलांग झालेले आहे. येथील अस्पृश्यांनी जे ओंगळवाणे व घृणास्पद

जीवन जगले ते या समाजव्यवस्थेमुळे. त्या समाजव्यवस्थेचा अमानुषपणा संताप आणणारा आहे. यातील स्त्रिया असल्यामुळे, कुटुंब समाज व पुषरूप्रधान संस्कृती या तीन स्तरावर शोधल्या गेल्या. एक स्त्री म्हणून येथील दु:खाचे स्तर अधिक गहिरे आहेत.

बेबी कांबळे यांचे आत्मकथन यादृष्टीने अधिक महत्त्वाचे वाटते. कारण इतर दलित आत्मकथनांपेक्षा ते काहीसे वेगळे आहे. कारण वैयक्तिक चित्रणापेक्षा त्यांना समाजाविषयी अधिक ज्ञान वाचकांना मिळते. 'समूहवेदना' त्यांच्या आत्मचरित्रात ठायी ठायी दिसते. कारण लेखिकेला स्वत:पेक्षा स्वसमाजाचे भोगवटे चित्रित करण्यात अधिक स्वारस्य आहे. म्हणून समाजातीली विविध शोषणाचे, दु:खाचे प्रकार व डॉ. बाबासाहेबांमुळे आलेले परिवर्तन त्यांनी चित्रित केले आहे. आपल्या समाजाला आत्मभान यावे म्हणून बेबी कांबळ्यांची ही तळमळ बघितली की लेखकाच्या पिंडापेक्षा त्यांचा सुधारकी पिंड मनाला जास्त भावतो. केवळ आपले जीवन, आपले कर्तृत्त्व, आपला बडेजाव मांडणे या हेतूने लेखिकेने हे लेखन केले नसून लाखो वर्ष गुलामगिरीत आयुष्य कंठणारी, देशाची खरीखुरी लेकरं कशी अग्निदिव्यातून बाहेर पडली आहेत हे भावीपिढींना कळण्यासाठी व हे कर्तृत्त्व एकट्या भीमरावांनी केले हेही भावी पिढीला कळायला हवे. या उदात्ता सामाजिक हेतूनी त्यांनी हे लेखन केले. विविध जाती जमातीची दैन्य दारिद्रय शोषणपद्धती वेगळी असली तरी त्यांची शोषण करणारी विषमताधिष्ठित समाजव्यवस्था एकच होती. म्हणून प्रत्येक आत्मकथनांत विद्रोही भूमिका घेतलेली दिसून येते.

**सारांश :**

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतील समाजजीवन प्रातिनिधीक स्वरूपाचे आहे. स्त्रियांच्या संदर्भात ते महत्त्वाचे आहेच पण त्याचबरोबर दलित जीवनाची समाजव्यवस्थेने केलेली अलक्षित बाजूही यातून दिसते. अस्पृश्यता अज्ञान व अंधश्रद्धा या तीन महत्त्वाच्या गोष्टींमुळे येथील पुरूष भरडला गेला व कुटुंब, समाजव्यवस्था या गोष्टींमुळे येथील स्त्रीला गुहाजीवन जगावे लागले. यावरून तत्कालीन दलित जीवनावर जसा प्रकाश पडतो तसा त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीमुळे भिन्न स्तरावरची दलित समाजाची लढाई व शोषणही आपल्याला दिसून येते. ही आत्मकथने ग्रामीण जीवनाशी निगडीत असली तरी गावकुसाबाहेरील सामाजिक द्वंद्व त्यात दिसते. ही आत्मकथने या दोन स्त्रियांची नसून सर्वंकष शोषित दलित स्त्रीची आहेत. म्हणून सामाजिकदृष्ट्या ती महत्त्वाची ठरतात.

पुढील प्रकरणात 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सांस्कृतिकता लक्षात घेऊ.

-----

# संदर्भ ग्रंथ सूची


१) बर्हसन मॉसिम : 'प्रस्तावना', 'जिणं आमुचं' - बेबी कांबळे, रचना प्रकाशन, १९८६, पृ.क्र.१.

२) निगुडकर भारती : 'दलित स्त्रीजीवनाचा मार्मिक आत्मशोध', महाराष्ट्र टाईम्स पुरवणी, दि. ११.१.१९८७, पृ.क्र.३.

३) जाधव विलास : 'दलित स्त्रीच्या दु:खाची कहाणी', केसरी, पुणे, रविवार पुरवणी, दि.६.७.१९८६, पृ.क्र.२.

४) कांबळे शांताबाई : 'थोड प्रास्ताविक', पृष्ठ क्र. ६ सुगावा प्रकाशन, 'माज्या जल्माची चित्तरकथा', १९८६.

५) भावे स.शि. : 'शांताबाई कांबळ्याची अभिजात आत्मकथा', महाराष्ट्र टाईम्स पुरवणी, १९८६, पृ.क्र.३.

६) कऱ्हाडे सदा : 'साहित्य विशेष लेख', स्वरूप प्रकाशन, १९९९, पृ.क्र.९०, ९१.

७) कांबळे शांताबाई : 'माज्या जल्माची चित्तरकथा', सुगावा प्रकाशन, १९८६, पृ.क्र.६.

८) कांबळे शांताबाई : 'पूर्वोक्त', पृ.क्र.६.

९) कांबळे शांताबाई : 'पूर्वोक्त', पृ.क्र.२४.

१०) कांबळे शांताबाई : 'पूर्वोक्त', पृ.क्र.१३९.

११) कांबळे बेबी : 'जिणं आमुचं', रचना प्रकाशन, १९८६, पृ.क्र.५४.

१२) कांबळे बेबी : 'जिणं आमुचं', रचना प्रकाशन, १९८६, पृ.क्र.५५.

१३) कांबळे शांताबाई : 'माज्या जल्माची चित्तरकथा', सुगावा प्रकाशन, १९८६, पृ.क्र.८८.

१४) कांबळे शांताबाई : 'पूर्वोक्त', पृ.क्र.३५.

१५) कांबळे बेबी : 'जिणं आमुचं', रचना प्रकाशन, प्रस्तावना.

१६) कांबळे शांताबाई : 'पूर्वोक्त', पृ.क्र.१५८.

१७) कांबळे बेबी : 'जिणं आमुचं', रचना प्रकाशन, पूर्वोक्त, पृ.क्र.६६.

१८) कांबळे शांताबाई : 'पूर्वोक्त', पृ.क्र.१२२.

१९) कांबळे बेबी : 'पूर्वोक्त', पृ.क्र.१२०.


-----